# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राजस्थानी समाजामार्फत गणगौर उत्सव मोठया प्रमाणावर साजरा केला जातो. महानगरपालिकेमार्फत सदर सणानिमित्त भाईंदर पुर्व व पश्चिम येथे चौपाटीवर सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात येतात.

भाईंदर पुर्व चौपाटी येथे मागील काही वर्षापासुन दोन संस्थामार्फत कार्यक्रम करण्यासाठी परवानगी मागण्यात येत होती. सदर परवानगी व कार्यक्रम ठिकाणाबाबत नेहमी वाद होऊन मा.न्यायालयात देखिल दावे दाखल झाले होते.

या वर्षी देखिल 27 मार्च ते 31 मार्च 2025 रोजी दोन संस्थामार्फत गणगौर सणानिमित्त सामाजिक कार्यक्रमासाठी परवानगी मागण्यात आली होती. सदर परवानगीच्या अनुशंगाने मा.श्री.राधाबिनोद शर्मा, आयुक्त तथा प्रशासक यांनी राजस्थानी जन जागरण सेवा संस्था व श्री सप्तेश्वर सालासर हनुमान मंदिर (मे.सर्वेश्वर चॅरीटेबल ट्रस्ट) या दोन्ही संस्थेना चर्चेसाठी दि.19/05/2025 रोजी बोलविण्यात आले. श्री. दिपक खांबित, शहर अभियंता यांनी बैठकीत सदर कार्यक्रमाची पार्श्वभुमी, मागील कार्यक्रमाबाबतचे निर्णय, मा.उच्च न्यायालयाचे आदेश याबाबत वस्तुस्थिती तसेच सदर प्रकरणात अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार हे मा.आयुक्त यांना आहेत हे सांगितले.

मा.आयुक्त यांनी सदर बैठकीत दोन्ही संस्था या एकाच समाजातील असुन सामाजिक कार्य करीत असल्याने दोन्ही संस्थानी एकत्रित निर्णय घेऊन कळविण्याबाबत सुचना केली. त्या अनुशंगाने दोन्ही संस्थानी एकत्रित पणे कार्यक्रम करण्यासाठी महानगरपालिकेकडे अर्ज केला. त्यानुसार मा.आयुक्त यांनी एकत्रित परवानगी देण्यास मान्यता दिली.

मागील 7 ते 8 वर्षापासुन सदर दोन संस्था मध्ये असलेला वाद हा मा.आयुक्त यांच्या मध्यस्थीने यशस्वीरीत्या सोडविण्यात आला.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2024-25/DK/AD-10

Scanned with OKEN Scanner